## महाविद्यालयातील Mentor-Mentee समितीच्या व भूगोल विभागाच्यावतीने गरजू मजुरांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले



श्रीपतराव चौगुले महाविद्यालयातील Mentor-Mentee समितीच्या व भूगोल विभागाच्यावतीने गरजू मजुरांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले भारतात व राज्यात कोरोना विषाणूमुळे महामारीची साथ चालू आहे. यामुळे सरकारने जाहीर केलेल्या लॉकडाऊनमुळे अनेक परराज्यातील मजूर अनेक ठिकाणी अडकून पडले आहेत. अशाच उत्तरे गावात रस्त्याच्या कामासाठी आलेले विजापूर येथील मजूर लॉकडाऊनमुळे अडकून पडले आहेत. हातावर पोट असलेल्या अशा मजुरांना कामधंदा नसल्यामुळे या गरीब कुटुंबांतील लहान मुले व स्त्रिया यांची अन्ना अभावी होणारी चरफडीची दखल ह्याच कुटुंबांना 2 दिवसापूर्वी मास्क वाटप करत असताना लक्षात येताच श्रीपतराव चौगुले महाविद्यालयातील Mentor-Mentee समितीच्या व भूगोल विभागाच्यावतीने या गरीब व गरजू मजुरांना 80 kg. तांदूळ, 40kg. गहू, 15 kg. तूरडाळ, 6 kg. चहापावडर, 40 kg. मक्का, कांदे, बिस्कीटपुडे अशा जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून महाविद्यालयाने आपली एक सामाजिक जबाबदारी जपण्याचे काम केले आहे. अशा प्रकारची मदत करून या कोरोना महामारीच्या लढाईत सहभाग घेतला आहे. यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. डॉ. के. एस. चौगुले , सचिव शिवाजीराव पाटील, संचालक डॉ. अजय चौगुले, प्र. प्राचार्य डॉ. बी. एन. रावण यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी उत्तरे गावातील आजी माजी विद्यार्थी श्रीरंग पाटील, अक्षय मगर, मेघा मगर, प्रतीक्षा पाटील, स्वरूपा आरंडे, प्रकाश कांबळे, तसेच Mentor-Mentee समिती प्रमुख डॉ. भारती शिंदे, भरत पाटील भूगोल विभाग प्रमुख उपस्थिती होते.

फोटो ओळ: मजुरांना अन्नधान्य व अत्यावश्यक गरजु वस्तूंचे वाटप करताना श्रीपतराव चौगुले कॉलेजचे उत्तरे गावातील आजी-माजी विद्यार्थी, संस्था सचिव श्री. शिवाजी पाटील, डॉ.भारती शिंदे, प्रा.भरत पाटील